# प्रो कबड्डी लीग स्पर्धेत पुणेरी पलटणचा गुजरात टायटन्सवर दणदणीत विजय

- पलटण संघ सलग चार सामन्यात अपराजित
- गुजरात जाएंटसचा सलग चौथा पराभव
- पलटण संघ अव्वल स्थानावर कायम

हैदराबाद, 4 नोव्हेंबर - गौरव खत्री आणि अमनच्या भक्कम बचावाच्या तटबंदीच्या जोरावर पुणेरी पलटणने प्रो-कबड्डीच्या अकराव्या हंगामात आणखी एका सहज विजयाची नोंद केली. गौरव आणि अमन दोघांनी प्रत्येकी पाच गडी बाद करताना केलेल्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर पुणेरी पलटणने सोमवारी झालेल्या सामन्यात गुजरात जाएंटस संघाचा ४९-३० असा दणदणीत पराभव केला. आकाश शिंदेने चढाईत नोंदवलेले सुपर टेनही पलटण संघाच्या विजयात तेवढेच निर्णायक ठरले.

पुणेरी पलटण संघाने आज सामन्याच्या सुरुवातीपासूनच सामन्याला कमालीचा वेग दिला. पलटण संघाच्या आक्रमक खेळापुढे गुजरात जाएंटस संघ साफ निष्प्रभ ठरला. पंकज मोहिते आणि आकाश शिंदेच्या चढाया गुण मिळवत असतानाच गौरव खत्री आणि अमन या कोपरारक्षकांच्या तटबंदी भेदण्यात गुजरात जाएंट्सच्या खेळाडूंना अपयश आले. हे अपयशच गुजरातच्या पराभवाचे मुख्य कारण ठरले. जाएंटसकडून गुमानसिंगच्या चढाईतील गुणांखेरीज बचावात त्यांना बचावाच्या आघाडीवर साफ अपयश आले. सामन्यात एकूण चार लोणची नोंद झाली, या वरुन सामना किती वेगवान झाला याची कल्पना येते. यामध्ये तीन लोण गुजरातला स्विकारावे लागले, तर पलटण संघाला सामना संपण्यास पाच मिनिटे शिल्लक असताना एक लोण स्विकारावा लागला.

पलटणच्या खेळाडूंचा जोश बघता आज ते गुणांचे अर्धशतक पार करणार असे वाटत होते. मात्र, ते एका गुणापासून वंचित राहिले. पलटण संघाने पहिल्या दहा मिनिटांत १४-४, नंतरच्या १० मिनिटांत १५-६, उत्तरार्धात सुरुवातीच्या दहा मिनिटांत ११-४ असा गुणांचा सपाटा लावला होता. या विजयाने पलटण संघाची गेल्या चार सामन्यातील अपराजित कामगिरी कायम राहिली. यात तीन विजय, तर एका बरोबरीचा समावेश आहे. गुजरात जाएंटस संघाला मात्र सलग चौथ्या पराभवाचा सामना करावा लागला.

सामन्याला सुरुवातीपासून पलटण संघाचे आक्रमण रोखणे जाएंटसच्या खेळाडूंना कठिण गेले. गौरव आणि अमन या दोन्ही कोपरारक्षाची नजर पहिल्या मिनिटापासून बसली होती. त्यांच्या कचाट्यातून सुटणे गुजरात जाएंटसच्या चढाईपटूंना जमलेच नाही. पलटणकडून मोहित गोएतने सुरुवात केली. पण, त्यांचा चढाईतील जोश पंकज आणि विशेष करुन आणखी एकदा पहिल्या सातमध्ये खेळण्याची संधी मिळालेल्या आकाश शिंदेचा अधिक होता. त्यांच्या वेगवान चढायांनी पलटणला इतके पुढे नेले की पूर्वार्धातील दोन लोणसह मध्यंतराला पलटण संघाने ३०-९ अशी मोठी आघाडी मिळवली होती.  पलटणच्या अधिक मोठ्या विजयाची ही नांदी होती.  मात्र, उत्तरार्धात पलटण संघाने सामना एकदम संथ केला आणि त्यचा फायदा गुजरात जाएटंसने उठवला. गुमान सिंगच्या खोलवर चढायांनी जाएंटसचा आत्मविश्वास उंचावला. हिमांशुचीही त्याला सुरेख साथ मिळाली. यामुळे उत्तरार्धात जाएंटस संघाचे एक पाऊल पुढे राहिले होते.

पूर्वार्धात पलटणच्या (१५) तुलनेत चढाईत मागे राहिलेल्या जाएंटसने (७) उत्तरार्धात मात्र कमाल केली. उत्तरार्धात त्यांनी चढाईत १२ गुणांची कमाई केली. पलटणला मात्र नऊच गुण मिळवता आले. बचावात देखील पलटण (६) आणि जाएंटस (५) यांच्यात फारसा फरक राहिला नव्हता. सामना संपण्यास पाच मिनिटे बाकी असताना जाएंटसने एक लोणही चढवला होता. पण, पूर्वार्धात दोन आणि उत्तरार्धात संथ खेळ करुनही स्विकारावा लागलेला एक असे तीन लोणने पलटण आणि जाएंटस यांच्या गुणांत निर्माण केलेली दरीच अखेर निर्णायक ठरली. पलटणकडून आकाश शिंदेने ११ गुणांची कमाई केली. पंकज मोहितेने ८, तर बचावात अमन आणि गौरवने प्रकत्येकी ५ गुण नोंदवले. जाएंटसकडून गुमान सिंगने १२, तर हिमांशुने ५ गुणांची कमाई केली.